आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१८ जुलै २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- अधिवेशन काळात विधानभवन परिसरात निर्बंधात वाढ/ कालच्या मारहाणीसंदर्भात गुन्हा दाखल

- सफाई कामाची रोबोटिक यंत्र खरेदी करण्यासाठी निधी देण्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं आश्वासन

- सांगली जिल्ह्यातल्या इस्लामपूरचं नाव बदलून ईश्वरपूर करण्याची शिफारस केंद्रसरकारकडे करण्याचा प्रस्ताव आज विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर

**आणि**

- सर्जनशील अर्थव्यवस्थेत कामासाठी धडपडणाऱ्यांना साधनसामुग्री आणि प्रशिक्षण देण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याची माहिती आणि प्रसारण मंत्र्यांची ग्वाही

**<><><><>**

विधान भवनात काल झालेल्या हाणामारीच्या घटनांना पायबंद घालण्यासाठी नीतीमूल्य समिती स्थापन करण्याची घोषणा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सभागृहात केली. एका आठवड्यात याचा निर्णय होईल अशी घोषणा अध्यक्षांनी केली. यापुढे अधिवेशन काळात विधिमंडळात सदस्य, स्वीय सहायक आणि अधिकाऱ्यांनाच प्रवेश दिला जाईल. इतर कुणालाही प्रवेश नसेल असं त्यांनी स्पष्ट केलं. तसंच मंत्र्यांनी विधिमंडळात बैठक घेण्यालाही अध्यक्षांनी मनाई केली. हे प्रकरण विशेष अधिकार समितीकडे सुपूर्द करण्यात आलं आहे. अध्यक्षांच्या सूचनेनंतर आमदार गोपीचंद पडळकर यांनी झालेल्या घटनेबद्दल खेद व्यक्त केला. तर या घटनेला आपण प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे जबाबदार नाही असं आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सांगितलं. तरीही या घटनेचं आपल्याला वाईट वाटतं असं आव्हाड म्हणाले.

दरम्यान, याप्रकरणी आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यासोबत आलेले नितीन देशमुख आणि गोपीचंद पडळकर यांच्यासोबत आलेले सर्जेराव टकले यांच्याविरोधात मरीन ड्राइव्ह

पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे दोघेही विधिमंडळात अनधिकृतपणे आले होते.

<><><><>

बोगस बियाणे विक्री करणाऱ्याविरोधात कठोर कायदा आणून तो राज्यात लागू करण्याचा विचार केंद्र सरकार करत असल्याचं कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज विधानसभेत सांगितलं. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी याबाबत प्रश्न विचारला होता. बोगस बियाणे विक्रेत्यांविरोधात होणाऱ्या किरकोळ कारवाईमुळे हे प्रकार सातत्याने होत असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

सफाई कामाकरता रोबोटिक यंत्र खरेदी करण्याचं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिलं. हाताने मैला वाहून नेण्याचा प्रकार पूर्णपणे बंद होईल, असं ते म्हणाले. कामगाराचा काम करताना मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबाला तीस लाख रुपये, कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास वीस लाख रूपये आणि अपंगत्व आल्यास दहा लाख रुपये देण्याचा निर्णय सरकारनं घेतल्याचं सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितलं. रोबोटिक मशीन खरेदी करण्यासाठी शंभर कोटी रुपये निधी उपलब्ध आहे. मृत कामगारांच्या वारसांना नोकरी देण्याचे निर्देश महानगरपालिका, नगरपालिकांना दिले असल्याचं शिरसाट यांनी सांगितलं.

<><><><>

दहीहंडी खेळात भाग घेणाऱ्या दीड लाख गोविंदांचा विमा उतरवला जाईल असं क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितलं. अमित साटम यांनी हा मुद्दा विधानसभेत उपस्थित केला होता. ही माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी आज विधानपरिषदेत दिली.

<><><><>

राज्यातल्या खासगी अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांमधे कार्यरत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसंदर्भात, टप्पा अनुदानाचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत झाला असून, पुढच्या महिन्यापासून त्याची अंमलबजावणी केली जाईल, असं शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज विधानसभेत सांगितलं. या टप्पा अनुदानाच्या पोटी वार्षिक ९७० कोटी ४२ लाख रुपये अतिरिक्त खर्च येणार आहे, असं त्यांनी सांगितलं.

राज्य आणि केंद्र पुरस्कृत तीन योजनांतर्गत दिव्यांगांना दिल्या जाणाऱ्या अनुदानात दरमहा दीड हजार रुपयांपासून दरमहा अडीच हजार रुपये इतकी वाढ करत असल्याची घोषणा दिव्यांग कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी आज विधानपरिषदेत केली. राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना आणि केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना या योजनांच्या लाभार्थ्यांना हा लाभ मिळेल.

महाराष्ट्राचा राज्य महोत्सव म्हणून यंदापासून गणेशोत्सव साजरा होणार असून त्यानिमित्त होणाऱ्या विविध कार्यक्रमांची रुपरेषा आज सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत जाहीर केली.

<><><><>

सीबीएसईच्या अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाचा योग्य समावेश करण्यासंदर्भात शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची भेट घेतली असून सीबीएसईच्या सातवी आणि दहावीच्या अभ्यासक्रमात छत्रपतींच्या कार्याचा समावेश करण्याचं आश्वासन प्रधान यांनी दिल्याची माहिती शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी आज विधानपरिषदेत दिली.

<><><><>

मुंबई विभागात गेल्या ६ वर्षांत मराठी माध्यमाच्या ३९ शाळा बंद झाल्याची माहिती सरकारनं आज विधानपरिषदेत लेखी उत्तरात दिली. आमदार सुनील शिंदे यांनी याबाबतचा तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. या बंद झालेल्या शाळांपैकी १४ शाळा दक्षिण मुंबईतल्या आहेत. मुंबई विभागातल्या पालकांचा कल दिवसेंदिवस इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे वाढत असून मराठी शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असल्याचंही सरकारनं नमूद केलं आहे.

<><><><>

सांगली जिल्ह्यातल्या इस्लामपूरचं नाव बदलून ईश्वरपूर करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्याचा प्रस्ताव आज विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात आला. आमदार सदाभाऊ खोत यांनी सांगितलं…

**-- होल्ड- बाईट - - खोत- -**

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१८ जुलै २०२५ - शुक्रवार

<><><><>

मुंबई शहर चित्रपट आणि सर्जनशीलतेची राजधानी असून सर्जनशील अर्थव्यवस्थेत कामासाठी धडपडणाऱ्यांना साधनसामुग्री आणि प्रशिक्षण देण्यासाठी आपलं सरकार वचनबद्ध असल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. मुंबईच्या राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ कार्यालयाच्या परिसरात आज इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. केंद्र सरकारने मे महिन्यात आयोजित केलेल्या वेव्हज उपक्रमाचा कार्य अहवालही यावेळी प्रकाशित करण्यात आला.

देशाच्या भविष्यासाठी विशेषतः तरुणांना मनोरंजन क्षेत्रात नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनं हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचं वैष्णव यावेळी म्हणाले. देशातल्या आयआयटी आणि आयआयएम शैक्षणिक संस्थांच्या धर्तीवर सर्जनशील तंत्रज्ञानासाठीही शैक्षणिक संस्थांची निर्मिती व्हावी, असा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संकल्प आहे. यासाठी तंत्रज्ञान क्षेत्रातल्या विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांसोबत भागीदारी केल्याचंही वैष्णव यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. माहिती आणि प्रसारण विभागाचे सचिव संजय जाजू, प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी, राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार इत्यादी मान्यवर यावेळी उपस्थित होते. केंद्र सरकारने मे महिन्यात घेतलेल्या वेव्हज् या उपक्रमामुळे सर्जनशील अर्थव्यवस्थेला चालना मिळाल्याची भावना मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. आयआयसीटीसारखी संस्था मुंबईत सुरु केल्याबद्दल केंद्र सरकारचे आभार मानले. यावेळी IICT च्या बोधचिन्हाचं अनावरण झालं, आणि या संस्थेत आता अध्यापनाला सुरुवात झाल्याचं घोषित करण्यात आलं. प्रसार भारती आणि राज्य सरकार यांच्यात यावेळी एक सामंजस्य करार झाला. IICT चे पहिले अभ्यासक्रम ऑगस्ट महिन्यापासून सुरु होणार आहेत. या संस्थेत १८ प्रकारचे अभ्यासक्रम शिकवले जातील, ज्यात गेमिंग, पोस्ट प्रॉडक्शन, ॲनिमेशन, कॉमिक्स, एक्स्टेंडेड रियालिटी अशा क्षेत्रांशी संबंधित विषयांचा समावेश असेल.

<><><><>

अण्वस्त्र वाहून नेण्याची क्षमता असलेल्या पृथ्वी २ आणि अग्नि १ या आखूड पल्ल्याच्या बॅलास्टिक क्षेपणास्त्रांची चाचणी यशस्वी झाली आहे. ओडिशात चंडीपूर इथल्या एकात्मिक तळावरून या दोन्ही क्षेपणास्त्रांची कार्यचालन आणि तांत्रिक घटकांची पडताळणी पूर्ण झाली असल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. पृथ्वी २ या क्षेपणास्त्राचा पल्ला साडेतीनशे किलोमीटरचा असून पाचशे किलोपर्यंत आण्विक शस्त्रास्त्र वाहून नेण्याची त्याची क्षमता आहे. तर अग्नि-१ क्षेपणास्त्राचा पल्ला ७०० ते ९०० किलोमीटर आहे. ते एक हजार किलोग्रॅम वजन वाहून नेऊ शकतं. आकाश प्राईम या क्षेपणास्त्राचीही यशस्वी चाचणी काल झाली. हे क्षेपणास्त्र साडेचार हजार मीटर किंवा त्याहून अधिक उंचीवरील लक्ष्याचाही भेद घेण्यास सक्षम आहे.

**<><><><>**

१० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्येच्या शहरांमध्ये ‘सुपर स्वच्छ लीग’ श्रेणीमध्ये राज्यातून नवी मुंबईची निवड करण्यात आली आहे. ‘सुपर स्वच्छ लीग’मध्ये समाविष्ट झालेल्या देशातल्या मोठ्या शहरांमध्ये नवी मुंबई हे राज्यातलं एकमेव शहर आहे. याबद्दल नवी मुंबईचे रहिवासी आनंद व्यक्त करत आहेत. ऐकूया स्थापत्य अभियंता सुकुमार किल्लेदार यांनी दिलेली प्रतिक्रिया.

- **होल्ड बाईट - सुकुमार किल्लेदार –**

//<><><><>//